नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज़

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ५० Issue - 50 | वार - मंगळवार दि. १४ जुलै २०२६ Blow- Tuesday Date 14 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# लाखो बहिणींचा दरमहा मिळणारा हप्ता आता कायमचा बंद

## लाडकी बहीण योजनेतून १२ लाख नावे वगळली; ई-केवायसी प्रक्रियेत अपात्र; उत्पन्नाचे निकष न पाळल्याने कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'च्या लाभार्थी महिलांसाठी मोठी अपडेट समोर आली आहे. शासनाकडून करण्यात आलेली ई-केवायसी प्रक्रियेनंतर तब्बल १२ लाख महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहेत. परिणामी, अपात्र ठरलेल्या लाखो बहिणींचा दरमहा मिळणारा हप्ता आता कायमचा बंद होणार आहे. सुरुवातीला सुमारे ८० लाख महिला या योजनेतून कमी होतील असा अंदाज सरकारने वर्तवला होता; मात्र प्रत्यक्ष छाननीअंती हा आकडा १२ लाखांच्या पार गेला आहे.

योजनेच्या पारदर्शकतेसाठी राबवण्यात आलेल्या या विशेष मोहिमेत राज्यातील अनेक जिल्ह्यांमधून अपात्र महिलांची नावे यादीतून कमी करण्यात आली आहेत. यामध्ये बीड जिल्ह्याचा आकडा सर्वाधिक मोठा आणि चक्रावून टाकणारा आहे. एकट्या बीड जिल्ह्यातून तब्बल २८ लाख महिला या योजनेसाठी अपात्र ठरल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रक्रियेत ज्या महिलांची नावे चुकीच्या किंवा तांत्रिक पद्धतीने वगळली गेली आहेत, त्यांच्या तक्रारींची योग्य दखल घेऊन चौकशी केली जाईल, अशी ग्वाही देखील सरकारकडून देण्यात आली आहे.

योजनेची व्याप्ती वाढल्यानंतर यामध्ये पारदर्शकता राखण्यासाठी सरकारकडून ई-केवायसीसह काही महत्त्वाचे बदल आणि प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले होते. ज्या महिलांनी ही आवश्यक ई-केवायसी (श-घधउ) प्रक्रिया पूर्ण केली नाही, त्यांचे हप्ते रोखण्यात आले. याशिवाय, योजनेसाठी निश्चित करण्यात आलेले उत्पन्नाचे निकष लाभार्थी महिलांकडून पाळले गेले नसल्याचे छाननीत उघड झाले आहे.

**अपात्र ठरण्याची कारणे कोणती?**

या पडताळणीत समोर आलेल्या आकडेवारीनुसार, तब्बल १२ लाख महिलांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न हे सरकारने ठरवून दिलेल्या २.५ लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. तर ४.५ लाखांहून अधिक लाभार्थी महिलांचे वय हे ६५ वर्षांपेक्षा जास्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. महिलांसाठी असलेल्या या योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न चक्क पुरुषांनीही केल्याचे उघड झाले आहे. लाभार्थी यादीत तब्बल १४ हजार पुरुषांची नावे समाविष्ट असल्याचे तपासात समोर आले असून, कसून केलेल्या छाननीनंतर प्रशासनाने त्यांचे अर्ज तातडीने बाद केले आहेत.




# अक्कलकोट तालुक्यातील विविध रस्त्यासाठी ९ कोटी ५० लाख निधी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

अक्कलकोट तालुक्यातील ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाकडून ९ कोटी ५० लाख रुपयांचा मोठा निधी मंजूर करण्यात आला आहे. या भरघोस निधीमध्ये वागदरी जिल्हा परिषद गटाला मोठा वाटा मिळाला असून, परिसरातील तब्बल ६ प्रमुख रस्त्यांच्या विकासकामांना हिरवा कंदील मिळाला आहे. आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या सततच्या आणि यशस्वी पाठपुराव्यामुळे वागदरी जिल्हा परिषद गटातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला रस्त्यांचा प्रश्न आता कायमचा मार्गी



लागला आहे.

या निधीतून रस्त्यांचे मजबुतीकरण, दुरुस्ती आणि आवश्यक त्या ठिकाणी सी. डी. वर्कची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

वागदरी जिल्हा परिषद गटातील हे सर्व रस्ते परिसरातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. दर्जेदार आणि पक्क्या रस्त्यांमुळे आता शेतमालाची वाहतूक करणे सोपे होणार आहे. तसेच शालेय विद्यार्थी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि सुखकर होणार आहे.

पावसाळ्यात होणारी गैरसोय आणि खड्ड्यांच्या समस्येतून आता कायमची सुटका होणार असल्याने वागदरी, गोगाव, बादोला, बोरगाव आणि परिसरातील गावांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या या महत्त्वपूर्ण विकासकामांबद्दल वागदरी जिल्हा परिषद गटातील समस्त नागरिकांकडून आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार व्यक्त केले जात आहेत.

**गोगांव ते पडसावळ रोड आणि राज्य मार्ग ते अंबाबाई मंदिर रस्ता शेतकऱ्यासाठी व कर्नाटकाला जोडणारा रस्ता असल्याने यांनी फायदा परिसरातील लोकांना होईल. सदर काम मंजूर करण्यासाठी भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप, सरपंच वनिता सुरवसे यांनी सतत आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्याकडे पाठपुरावा करत होते गावाला जोडणाऱ्या रस्त्याचे मंजूरी मिळाल्याबद्दल ग्रामस्थ वतीने व ग्रामपंचायत वतीने आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी व उपसभापती सागर दादा कल्याणशेट्टी यांचे आभारी आहे गोगांवच्या विकासासाठी कल्याणशेट्टी परिवार कायम गावासोबत असल्याने आज गावच्या विकास कामाला गती दिले आहे.**

**- कमलाकर सोनकांबळे (उपसरपंच गोगाव)**

### गोगावच्या दोन रस्त्यासाठी निधी मंजूर

### वागदरी जिल्हा परिषद गटातील 'या' ६ प्रमुख रस्त्यांचा होणार कायापालट

**१) राज्य महामार्ग ते गोगाव (अंबाबाई मंदिर) २) गोगाव ते पडसलगी मार्ग ३) वागदरी ते बादोला (बु.) मार्ग ४) बोरगाव (दे.) ते किणीवाडी (मार्गे पालापूर-चुंगी) ५) सांगवी (बु.) ते कोळेकरवाडी मार्ग ६) बणजगोळ ते चिकेहळळी मार्ग**

# माथाडी, हमाल आणि श्रमजीवी कामगार कायद्यांमध्ये बदल होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगारांच्या सुरक्षा व कल्याणासाठी लागू असलेल्या विविध कामगार कायद्यांमध्ये कालसुसंगत सुधारणा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. कामगार विभागाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या या सुधारणांच्या आराखड्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी सोमवारी आढावा बैठक पार पडली. केंद्रीय कामगार कायद्यांशी सुसंगत अशी राज्याची नियमावली तयार करताना, या सुधारणांमधून व्यापक कामगार हित जपण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले जावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी दिले. तसेच, राज्याच्या हितासाठी आवश्यक असलेल्या काही स्थानिक सुधारणांचाही यात प्रामुख्याने समावेश करावा, अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

या बैठकीला कामगार मंत्री आकाश फुंडकर प्रत्यक्ष उपस्थित होते, तर कामगार राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे (तळवशे उेपषशीशपलळपस) बैठकीत सहभाग घेतला. या प्रसंगी कामगार विभागाच्या अपर मुख्य सचिव आय. ए. कुंदन यांनी कायद्यांमधील प्रस्तावित सुधारणांचे सविस्तर सादरीकरण केले. या बैठकीला उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अनबळगन, कामगार आयुक्त एच. पी. तुम्मोड, उपसचिव स्वप्निल कापडणीस यांसह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, 'महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार कायद्या'मध्ये सुधारणा करताना बांधकाम क्षेत्राशी संबंधित कामगारांच्या सदस्यत्वाचे दुहेरीकरण टाळणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी संबंधित कामगाराला 'बांधकाम कामगार कल्याण मंडळ' किंवा 'माथाडी मंडळ' यांपैकी नेमक्या कोणत्या तरी एकाच मंडळाचे सदस्यत्व मिळेल, याची काटेकोर सुनिश्चिती करण्यात यावी. याशिवाय, असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी केंद्राच्या नवीन कामगार कायद्यातील तरतुदींच्या अनुषंगाने प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र व सर्वसमावेशक कल्याणकारी योजना तयार कराव्यात, ज्यामध्ये घरेलू कामगारांचाही (घरकामगार) प्रामुख्याने समावेश असावा, असे सांगून हा संपूर्ण सुधारणा प्रस्ताव मंजुरीसाठी तातडीने मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. कायद्यातील सुधारणा करण्यात येणारी प्रत्येक बाब अत्यंत बारकाईने तपासून पाहण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिले. प्रस्तावित सुधारणांमध्ये कामगार न्यायालयांऐवजी 'मुख्य न्यायदंडाधिकारी' अशी नवी तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीच्या अनुषंगाने मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांकडे कामगारांशी संबंधित असलेल्या प्रलंबित प्रकरणांचा जिल्हानिहाय अहवाल सादर करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच, मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांवर कामगारांच्या प्रकरणांच्या निपटाऱ्याचा अतिरिक्त ताण किंवा दबाव येणार नाही, याबाबत कामगार विभागाने विशेष दक्षता घ्यावी. केंद्राच्या नवीन कामगार कायद्यांमधील यासंबंधीच्या तरतुदींची व वस्तुस्थितीची पूर्ण पडताळणी करूनच अंतिम निर्णय घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

**निर्भीड लेखणीचा आणि निस्वार्थ सेवेचा सन्मान**

**'आर्यारवी एंटरटेनमेंट'चा पहिला पुरस्कार सोहळा मुंबईत दिमाखात संपन्न**

# दैनिक यश सिद्धी न्यूज संपादक कमलाकर सोनकांबळे यांना निर्भीड संपादक पुरस्कारांनी सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : समाजातील तळागाळातील प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या निर्भीड पत्रकारांचा आणि समाजासाठी झटणाऱ्या निस्वार्थ समाजसेवकांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी 'आर्यारवी एंटरटेनमेंट'च्या वतीने आयोजित पहिला भव्य 'पत्रकार, मुक्त पत्रकार, संपादक, कला, साहित्य आणि समाजसेवक पुरस्कार सोहळा' रविवारी (१२ जुलै) मुंबईत अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. महाराष्ट्रातील तळागाळातील लेखणीला सलाम हा उदात्त हेतू उराशी बाळगून या प्रेरणादायी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दादर (पूर्व) येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुरेंद्र गावस्कर हॉलमध्ये हा सोहळा पार पडला. सोलापूरचे दैनिक यश सिद्धी न्यूज संपादक कमलाकर सोनकांबळे याना निर्भीड संपादक म्हणून मान्यवरांचा हस्ते सन्मान करण्यात आले कार्यक्रमाची दिमाखदार सुरुवात प्रमुख अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. 'आर्यारवी एंटरटेनमेंट'चे







सर्वेसर्वा आणि या सोहळ्याचे मुख्य आयोजक श्री. महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी आपल्या प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याचा आढावा घेत मान्यवरांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. तर, डॉ. सूर्यभान डोंगरे यांनी आपल्या रसाळ आणि ओघवत्या वाणीने केलेल्या उत्कृष्ट सूत्रसंचालनाने उपस्थित पत्रकार आणि मान्यवरांची मने जिंकली.

या सोहळ्याला अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. जगप्रसिद्ध बोलके बाहुलाकार श्रीधर कीर, 'कुटुंब रंगलंय काव्यात'चे सादरकर्ते प्रा. विसुभाऊ बापट, प्रसिद्ध कवी व साहित्यिक अरुण म्हात्रे, साहित्याचार्य पंढरीनाथ तामोरे, ज्येष्ठ पत्रकार गुरुनाथ तिरपणकर, ज्येष्ठ पत्रकार, समाजसेवक प्रभाकर तोडणकर, प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते कांचन पगारे, अभिनेते, निर्माते दिलीप कांबळे, समाजसेवक ॲड. सुनिल भार्गवराम शिर्के, वैभव सुरेश कदम, 'स्पेस रिअलटर्स'चे अतुल तोडकरी, कृष्णा काजरोळकर आणि अभिनेते ॲड. गौरव जयवंत पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून मंचावर उपस्थित होते. या मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यातील कानाकोपऱ्यातून आलेल्या गुणवंतांना त्यांच्या अलौकिक कार्याबद्दल 'स्वाभिमान लेखणी', 'शब्दवेध गौरव', 'अजेय लेखणी', 'कलम-रत्न', 'साहित्य-संस्कृती जीवनगौरव', 'विवेक-दीप', 'कलागौरव', 'जन-सेवा रक्षक', आणि 'निर्भीड पत्रकारिता' यांसारख्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. गावागावांतील पत्रकारांचा सन्मान हे जिकिरीचे काम आपल्या मनोगतात ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी आयोजकांचे भरभरून कौतुक केले. ते म्हणाले, महाराष्ट्रातील गावागावांत विखुरलेल्या पत्रकारांचा शोध घेऊन त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान करणे ही अत्यंत जिकिरीची बाब आहे, जी महेश्वर तेटांबे यांनी यशस्वीपणे साध्य करून दाखवली आहे. प्रा. विसुभाऊ बापट यांनी या नाविन्यपूर्ण उपक्रमाला सदिच्छा दिल्या. तर, जगद्विख्यात बोलके बाहुलाकार श्रीधर कीर यांनी महेश्वर तेटांबे यांच्या धाडसी वृत्तीचे कौतुक करताना सांगितले की, हा पुरस्कार सोहळा वाखाणण्याजोगा असून, तो प्रत्येक पुरस्कारार्थीला समाजासाठी अधिक जोमाने काम करण्याची नवी प्रेरणा देईल. ज्येष्ठ पत्रकार गुरुनाथ तिरपणकर यांनी आयोजनातील शिस्तप्रियतेचे कौतुक करत तेटांबे यांच्या पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या. या भव्य सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी अभिनेत्री लक्ष्मी गुप्ता, प्रियांका फणसोपकर, अभिनेता व दिग्दर्शक अविनाश घाडी, निलेश घाडी, निखिल कटारे, पत्रकार राहुल खरात, रघुनाथ ढोक, केतन भोज, छायाचित्रकार नरेंद्र भोसले आणि राहुल शिंदे यांचे विशेष योगदान आणि सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी अभिनेते अविनाश राऊत यांनी सर्वांचे आभार मानले. ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांनी गायलेल्या राष्ट्रगीताने या प्रेरणादायी, ऊर्जावान आणि अविस्मरणीय सोहळ्याची सांगता झाली.

**ग्रामीण भागातील एक युवा पत्रकार स्वतःच्या कष्टातून संघर्ष करत गेल्या तीन वर्षापासून दैनिक यश सिद्धी न्यूज सोलापूर जिल्हा सह महाराष्ट्र पोचवण्याचे काम करीत असून सर्व सामान्य वंचित घटकांतील लोकांना न्याय देण्याचे काम करीत आहे यांची दखल घेत आर्यारवी एंटरटेन्मेट आयोजित निर्भीड पत्रकार पुरस्कार कमलाकर सोनकांबळे याना देऊन सन्मानित करण्यात आले.**

## संपादकीय....


### कारवाईचा बडगा

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची व्याप्ती वाढल्यानंतर यामध्ये पारदर्शकता राखण्यासाठी सरकारकडून ई-केवायसीसह काही महत्त्वाचे बदल आणि प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले होते. ज्या महिलांनी ही आवश्यक ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नाही, त्यांचे हप्ते रोखण्यात आले. याशिवाय, योजनेसाठी निश्चित करण्यात आलेले उत्पन्नाचे निकष लाभार्थी महिलांकडून पाळले गेले नसल्याचे छाननीत उघड झाले आहे. या पडताळणीत समोर आलेल्या आकडेवारीनुसार, तब्बल १२ लाख महिलांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न हे सरकारने ठरवून दिलेल्या २.५ लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. तर ४.५ लाखांहून अधिक लाभार्थी महिलांचे वय हे ६५ वर्षांपेक्षा जास्त असल्याचे स्पष्ट झाले आहे. महिलांसाठी असलेल्या या योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न चक्क पुरुषांनीही केल्याचे उघड झाले आहे. लाभार्थी यादीत तब्बल १४ हजार पुरुषांची नावे समाविष्ट असल्याचे तपासात समोर आले असून, कसून केलेल्या छाननीनंतर प्रशासनाने त्यांचे अर्ज तातडीने बाद केले आहेत. शासनाकडून करण्यात आलेली ई-केवायसी प्रक्रियेनंतर तब्बल ९२ लाख महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहेत. परिणामी, अपात्र ठरलेल्या लाखो बहिणींचा दरमहा मिळणारा हप्ता आता कायमचा बंद होणार आहे. सुरुवातीला सुमारे ८० लाख महिला या योजनेतून कमी होतील असा अंदाज सरकारने वर्तवला होता; मात्र प्रत्यक्ष छाननीअंती हा आकडा ९२ लाखांच्या पार गेला आहे.

# क्रीडांगण वाचवण्यासाठी अल्पभूधारक शेतकऱ्याचा बळी?; महापारेषणच्या टॉवरला सारोळे खुर्दमध्ये तीव्र विरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : विकासकामांसाठी शेतकऱ्यांचेसहकार्य आवश्यक असले, तरी विकासाच्या नावाखाली सर्वसामान्य अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हितावर गदा आणली जात असेल, तर तो विकास नसून सामाजिक दरी निर्माण करणारा प्रकार आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया निफाड तालुक्यातील सारोळे खुर्द येथील बाधित शेतकरी राजकीय त्र्यंबकगिर गोसावी व अन्य शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.महापारेषण व वीज वितरण विभागाच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील बाभळेश्वर येथील धर्तीवर ४२० केव्ही वीज प्रकल्प उभारण्यात येत असून, या प्रकल्पासाठी उभारण्यात येणारी उच्चदाब वीजवाहिनी सारोळे खुर्द परिसरातून जात आहे. संबंधित टॉवर व वीजवाहिनी ही गोसावी यांच्या शेतातून प्रस्तावित करण्यात



आली आहे. विशेष म्हणजे ही जमीन आशिया खंडातील सर्वात मोठी कांदा बाजार समिती असलेल्या नाशिक-पिंपळगाव महामार्गालगत असून भविष्यात व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाची ठरणारी असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे.

बाधित शेतकऱ्यांचा आरोप आहे की, त्यांच्या जमिनी ऐवजी मागील बाजूच्या शासकीय भूखंडावरील शेतातून वीजवाहिनी नेल्यास कोणताही मोठा अडथळा निर्माण होणार नाही. तसेच शेतकऱ्यांनी पर्यायी मार्गही प्रशासनाला सुचविला आहे. मात्र, शासकीय जागा व क्रीडांगण वाचविण्यासाठी जाणीवपूर्वक अल्पभूधारक शेतकऱ्याच्या जमिनीवर अवजड टॉवर टाकण्याचा निर्णय घेतला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

आमचा विकासाला विरोध नाही. मात्र, आमच्या उपजीविकेचा आधार असलेल्या आणि भविष्यात व्यावसायिक उपयोगाची संधी असलेल्या जमिनीचे नुकसान करून विकास करणे योग्य नाही. पर्यायी मार्ग उपलब्ध असतानाही प्रशासन व संबंधित ठेकेदार आमचे म्हणणे ऐकून घेत नाहीत, अशी खंत राजगीर गोसावी यांनी व्यक्त केली. संबंधित प्रकरणात ठेकेदार व काही प्रशासकीय अधिकाऱ्यांची संगनमत असल्याचाही संशय शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे शासकीय जागा व क्रीडांगण वाचवण्यासाठी गरीब शेतकऱ्याच्या कुटुंबाच्या भवितव्यावर वरवंटा फिरवला जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणाकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनीही दुर्लक्ष केल्याचा आरोप करत, लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणार की प्रशासनाच्या निर्णयाचे समर्थन करणार? असा सवालही बाधित शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, आगामी पावसाळी अधिवेशनात या प्रश्नावर शासनाने भूमिका स्पष्ट करून बाधित शेतकऱ्याला न्याय द्यावा, अशी मागणी परिसरातील अल्पभूधारक शेतकऱ्यांकडून होत आहे. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांचे आर्थिक, सामाजिक व मानसिक नुकसान होणार असेल, तर अशा विकासाचा पुनर्विचार करण्याची वेळ आली असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

> विकासाच्या नावाखाली सर्वसामान्य शेतकऱ्यांची आर्थिक कंबरडे मोडण्याचा प्रयत्न केला जात असुन बाधित शेतकऱ्यांकडून आरोप होत आहेत, शासकीय व खाजगी रोजगार नसल्याने त्यात अल्पभूधारक कुटुंबातील उदरनिर्वासाठी शेती परवडत नाही म्हणून महामार्ग लगत असल्याने व्यावसायिक काही करण्याचे प्रयोजन असताना आमच्या कुटुंबातील आर्थिक विकासावर वरवंट फिरवला जात असेल तर आम्ही न्याय कोणाकडे मागायचा
>
> **– प्रमोद राजगीर गोसावी**
> **बाधित युवा शेतकरी सारोळे खुर्द.**

# रोटरी क्लब व इनरव्हील क्लब ऑफ कळंब सिटीचा पदग्रहण सोहळा व 'कळंब भूषण' पुरस्कार वितरण समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी व इनरव्हील क्लब ऑफ कळंब सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रोटरी वर्ष २०२६-२७ चा पदग्रहण सोहळा तसेच 'कळंब भूषण' पुरस्कार वितरण समारंभ रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी श्री महावीर भवन, कळंब येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाला. यावेळी रो.रवि नरहिरे यांनी रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीच्या अध्यक्षपदाची, तर रो.अभिजित भिसे यांनी सचिवपदाची सूत्रे स्वीकारली. तसेच सौ. पूर्वा पोरे यांनी इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा आणि सौ. स्वाती राजमाने यांनी सचिव म्हणून पदभार स्वीकारला. याचवेळी रोटरी व इनरव्हील



क्लबच्या २०२६-२७ च्या नवीन संचालक मंडळाचाही पदग्रहण सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमास डी.जी.नॉमिनी रो.सतीश लोणीकर आणि स.प्रांतपाल रो.प्रशांत अपराध यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावर्षीचा प्रतिष्ठेचा 'कळंब भूषण' पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यपाल परिवार व्यवस्थापक डॉ. निशिकांत देशपांडे यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला. पुरस्कारामध्ये मानपत्र, सन्मानचिन्ह, आणि रु.११,००० मानधनाचा समावेश होता. मात्र, आपल्या मनातील समाजसेवेची भावना जपत डॉ. निशिकांत देशपांडे यांनी पुरस्कारासोबत देण्यात आलेली रु.११,००० ची मानधनाची रक्कम अत्यंत नम्रपणे परत करून, ती रक्कम समाजोपयोगी कार्यासाठी वापरावी, अशी विनंती केली. त्यांच्या या उदात्त कृतीने उपस्थितांच्या मनावर अमिट ठसा उमटवला आणि समाजसेवेचा खरा आदर्श सर्वांसमोर ठेवला. आपल्या प्रेरणादायी मनोगतात त्यांनी जीवनातील अनेक अनुभव कथन करत ऊीशरींश डरीींळपस खारिलीं या रोटरी इंटरनॅशनलच्या यावर्षीच्या संकल्पनेचा अर्थ अत्यंत प्रभावीपणे उलगडून सांगितला.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या प्रा. माया मुळे यांनी मानवी जीवन व्हाया संवेदना आणि सौंदर्य या विषयावर अत्यंत हृदयस्पर्शी आणि विचारप्रवर्तक व्याख्यान दिले. मानवी जीवनातील संवेदनशीलता, माणुसकी, सौंदर्यदृष्टी आणि सामाजिक मूल्ये यांचा सुंदर संगम त्यांनी आपल्या प्रभावी शैलीत उलगडून सांगितला.

कार्यक्रमाचे नियोजन माजी अध्यक्ष रो.डॉ.अभिजित जाधवर, माजी सचिव रो.श्याम जाधवर, इनरव्हीलच्या माजी अध्यक्षा प्रा.प्रतिभा भवर, माजी सचिव डॉ.दिपाली लोंढे, तसेच रोटरी व इनरव्हीलच्या सर्व सदस्यांनी उत्कृष्टरीत्या केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो.संजय घुले आणि रो.सुशील तीर्थकर यांनी केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, रोटरी व इनरव्हील सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदर्श प्राथमिक विद्यालयाच्या इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांची मार्केट यार्डला शैक्षणिक क्षेत्र भेट: प्रत्यक्ष अनुभवातून व्यवहार ज्ञानाची उजळणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ वर्ग खोलीपुरते मर्यादित न राहता त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून जिवन उपयोगी ज्ञान मिळावे, या उद्देशाने आदर्श प्राथमिक विद्यालयाच्या इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांची पंढरपूर येथील मार्केट यार्ड येथे शैक्षणिक क्षेत्रभेट उत्साहात पार पडली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी शेतीमालाची खरेदी-विक्री प्रक्रिया, लिलाव पद्धती मालाची प्रतवारी, वजन काट्याचा वापर, साठवणूक, वाहतूक व्यवस्था तसेच शेतकरी व्यापारी आणि हमाल यांचे कामकाज जवळून पाहिले व बाजार समितीच्या कार्यपद्धतीची माहिती घेत विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या ज्ञानात भर घातली प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थ्यांना शेती अर्थव्यवस्था आणि बाजार व्यवस्थेचे महत्त्व समजून घेण्याची संधी मिळाली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण क्षमता, जिज्ञासा आणि व्यवहार ज्ञान विकसित होण्यास मोठी मदत झाली पुस्तकातील ज्ञानाची प्रत्यक्ष अनुभवाशी सांगड घालता विद्यार्थ्यांनीही क्षेत्रभेट आनंदाची आणि ज्ञानवर्धक असल्याची भावना व्यक्त केली.

ह्या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका सौ राजेश्री घंटी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले क्षेत्रभेट यशस्वी करण्यासाठी शिक्षिका शितल होनराव लक्ष्मी बोडके ऐश्वर्या कुलकर्णी, तृप्ती वाटरकर श्वेता डोईफोडे श्वेता ताड आणि सौ दराडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून नियोजनबद्ध सहकार्य केले.

संस्थेचे अध्यक्ष सतीश जी पुरंदरे, संस्थेच्या माजी अध्यक्ष विनाताई जोशी, रेखाताई उंबरकर, डॉक्टर अनिल जोशी, अँड ज्ञानेश्वरा आराध्ये,मा. प्रशांत परिचारक, रेखाताई भालेराव, श्री प्रशांत कुलकर्णी, डॉक्टर तेजस भोपटकर, आणि प्रसाद संत, संस्थेचे पदाधिकारी व सदस्य शाळेचे अशोक कर्मना संस्थेच्या सदस्यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन होते.

# शहरात मांस, मटण विक्रीस मनाई; दि. १५ ते २९ जुलै २०२५ या कालावधीत राहणार बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुध्द एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी असून , यात्रा कालावधी दि.१५ जुलै ते २९ जुलै २०२६ असा आहे. या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या कालावधीत पंढरपूर शहरात कायदा व सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी दि.१५ जुलै ते २९ जुलै २०२६ या कालावधीमध्ये मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्रीवर उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी बंदी आदेश जारी केले आहेत.

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून उपविभागीय दंडाधिकारी श्री इथापे यांनी सदर आदेश जारी केले आहेत.

करकंब व परिसरात मांस, मटण विक्रीस मनाई

आषाढी यात्रेसाठी राज्यातील विविध ठिकाणाहून मानाच्या व महत्त्वाच्या पालख्या करकंब (ता.पंढरपूर) येथे मुक्काम करीत असतात. या ठिकाणी लाखो भाविक करकंबसह आसपासच्या गावात मुक्कामास असतात. विविध सामाजिक व राजकीय संघटनाकडून तसेच भाविकांकडून मांस, मटण विक्रीस बंदी घालावी अशी मागणी होती.त्या अनुषंगाने करकंब व पांढरेवाडी, व्होळे, देवडे, खेडभोसे येथे दिनांक २० जुलै ते २५ जुलै २०२६ या कालावधीत मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे.

भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून उपविभागीय दंडाधिकारी श्री इथापे यांनी सदर आदेश जारी केले आहेत.

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७९ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा उत्साहात संपन्न

# आजची मुले ही उद्याची फुले; त्यांच्यावर सुसंस्कार करणे काळाची गरज : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजाची दिशाभूल करणाऱ्या पुढाऱ्यावर करडी नजर ठेवली पाहिजे (१ जुलै १९५४, खंड १८, भाग ३, पृष्ठ ३९२) या ऐतिहासिक व आजही तितक्याच प्रासंगिक विचारावर आधारित १७९ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा रविवारी (दि. १२ जुलै) साकेतनगर येथील संस्थेच्या कार्यालयात उत्साहात पार पडली.



कार्यशाळेच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम यांनी सांगितले की, आजची मुले ही उद्याची फुले असतात. त्यामुळे त्यांच्यावर जाणीवपूर्वक सुसंस्कार करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. लहान मुलांचे मन कोऱ्या पाटीप्रमाणे असते. त्यांच्यामध्ये समता, बंधुता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधाननिष्ठ मूल्यांची पेरणी बालपणापासूनच झाली पाहिजे. ते पुढे म्हणाले की, गरज ही शोधाची जननी आहे. समाजातील प्रश्नांवर केवळ टीका न करता सुज्ञ नागरिकांनी उपाययोजना शोधण्याची वृत्ती जोपासली पाहिजे. आज वैचारिक संघर्षाचा काळ असून सुशिक्षितांनी समाजाप्रती आपली बौद्धिक जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे. समाजातील अंतर्गत मतभेद समजून घेत सकारात्मक संवादातून संघटन अधिक मजबूत करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा संदर्भ देताना मेश्राम म्हणाले की, सामाजिक कार्याची तळमळ मोजक्याच लोकांमध्ये असते. त्यामुळे समाजाची दिशाभूल करणाऱ्या नेतृत्वावर जागरूकपणे लक्ष ठेवणे हे प्रत्येक सुशिक्षित नागरिकाचे कर्तव्य आहे. अन्यथा समाजाची अधोगती थांबविणे कठीण होईल.

उद्घाटक म्हणून बोलताना ग्लोबल ह्यूमन राइट्सचे प्रदेशाध्यक्ष विनायक सरवदे यांनी पुढारी आणि नेता यांतील मूलभूत फरक अधोरेखित केला. संविधाननिष्ठ नेतृत्वच देशाला योग्य दिशा देऊ शकते, असे ते म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानामुळेच आजचा भारतीय नागरिक सन्मानाने जगत असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रमुख वक्त्या वरिष्ठ संशोधन अधिकारी चंदा मगर यांनी सांगितले की, सामान्य नागरिक प्रत्येक पुढाऱ्यावर लक्ष ठेवू शकत नसला तरी समाजातील सुज्ञ आणि जागरूक घटकांनी नेतृत्वाचे सातत्याने मूल्यमापन केले पाहिजे. जन्माने नव्हे तर आचरणातून बुद्धमूल्ये स्वीकारली गेली पाहिजेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी उद्योजक मिलिंद बागुल, सुभाष ठोकळ, प्रा. शिवम गायकवाड, उद्योजक शशिकांत काळे आणि ड. विलास रामटेके यांनीही विविध सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक विषयांवर विचार मांडले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. विलास कटारे यांनी केले. सूत्रसंचालन ड. विलास रामटेके यांनी तर आभार सुभाष ठोकळ यांनी मानले. कार्यक्रमास डॉ. कल्पना गंगावणे, रतीका बनकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील प्रतिनिधी व अभ्यासक उपस्थित होते.

शब्दांकन : मेश्राम बी. बी. (संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फॉउंडेशन, छत्रपती संभाजीनगर)

संपर्क : ९४२१६७८६२८, ८९८३०८२१२८(WhatsApp)

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# गोविंदपुर येथे श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचे जल्लोषात स्वागत

## ‘शेगाव निवासी समर्थ सद्गुरु श्री संत गजानन महाराज की जय’ या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तीमय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
हनुमंत पाटुळे/खाम सवाडी प्रतिनिधी : पांढरे शुभ्र वस्त्र, डोक्यावर पांढरी टोपी, हात भगवे पताके, टाळ आणि मृदंगाच्या गजरात ७०० वारकऱ्यांच्या लयबद्ध ताफ्यासह श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे सोमवारी दि. १३ जुलै २०२६ रोजी दुपारी कळंब तालुक्यातील गोविंदपुर येथे आगमन झाले. या वेळी अनंत कोटी ब्रम्हांडनायक, राजाधिराज योगीराज, भक्त प्रतिपालक, शेगाव निवासी समर्थ सद्गुरु श्री संत गजानन महाराज की जय या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता.

पालखीचे आगमन होताच फटाक्यांच्या आतिषबाजीत, रांगोळी आणि फुलांनी सजवून श्रींचे स्वागत करण्यात आले. या वेळी श्री वैभव मुंडे, (संचालक जिल्हा मजूर संघ धाराशिव) यांच्या हस्ते पालखीचे स्वागत झाले. या वेळी ग्रामसेवक आशोक आम्ले, सरपंच आशोक मस्के, मधुकर मिसाळ, वसंत जाधव, सूर्यकांत मुंडे, पत्रकार अविनाश सावंत, विश्वास केंगार, हिरालाल मुंडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी गोविंदपु- ...रसह ...ेरा, जवळा, देवधान- हासेगाव, एकुरका, बोरगाव, गौरगाव, नागुलगाव, खाम सवाडी, नागझरवाडी, मंगरूळ, माळकरंजा, देवळाली आणि परिसरातील हजारो भाविक सकाळी १० वाजल्यापासूनच दर्शनासाठी रांगेत उभे होते. सकाळी ११ वाजता पालखीचे आगमन होताच परिसरात चैतन्य निर्माण झाले. पालखी सुमारे दीड ते दोन तास येथे थांबली होती.

वारकऱ्यांच्या आवडीचा महाप्रसाद म्हणजे गोविंदपुरची प्रसिद्ध अशी बेसन भाकरी..! यासाठी संपूर्ण गावातून शिधा गोळा करण्यात आला. यात ५० क्विंटल ज्वारी, ४ क्विंटल डाळ, कांदे, लसूण, मिरची यांचा समावेश होता. ३५ ते ४० कट्टे ज्वारी दळून घराघरात पीठ वाटप करून सकाळपर्यंत प्रत्येकाने केलेली भाकरी मंदिरात जमा केली जाते.

पालखीतील ७०० वारकऱ्यांसाठी ७००० पाणी बाटल्या, ६०० पाण्याचे जार, ५० किलो लोणचे, कांदा आणि, ३०० किलो जिलेबी-लाडू यांची व्यवस्था करण्यात आली होती. बाहेरील श्रद्धाळूंनी भाकरी, केळी, चिवड्याचे पाकीट वाटप केले.

वारकऱ्यांसाठी बालाजी सुरवसे आणि खंडू सुरवसे यांनी मोफत दाढी-कटिंग, विराज मेडिकलचे औदुंबर मुंडे यांनी मोफत वैद्यकीय तपासणी व औषध वाटप केले. यावेळी रेणुका ब्लड बँक धाराशिव यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

पालखीच्या सुरक्षेसाठी शिराढोण पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक एस. आर. घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदारांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

**विश्रांतीनंतर पालखी पुढील मुक्कामासाठी ढोकी तेरणा कारखान्याकडे रवाना झाली.**

# बार्टी संस्थेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी करिता आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे,मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी साठी एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. १०,०००/- एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते.

सदर निकालानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा २०२६ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी करिता आर्थिक सहाय्य देणेबाबत. पात्र असलेल्या उमेदवारांना एक रक्कमी रक्कम रु. १०,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थे मार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी http:// barti.maharashtra.gov.in NOTICEBORD Maharashtra Public Service Commission Non-Gazetted Group-B Main Examination 2026 येथे भेट द्यावी.

# विजय शंकर घनघाव शहापूर शिरोळ येथील स्मृतीशेष अमृता सुकाजी घनघाव गुरुजी यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित् कुंडनपाडा जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
राजेश घनघाव/ शिरोळ
शहापूर तालुक्यातील शिरोळ येथील स्मृतीशेष अमृता सुकाजी घनघाव गुरुजी यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्य आज कुंडन येथील जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

यावेळी शाळेतील इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना वह्या,पेन, कंपास पेटी यासह शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. साहित्य मिळाल्याने मुलांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत होता. या कार्यक्रमाला गुरुजींचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये सौ. भारती शांताराम पवार, शिरोळ ग्रामपंचायत सदस्या,( गुरुजींची मोठी मुलगी), श्री. राजेश अमृता घनघाव, श्री. वैभव अमृता घनघाव, गुरुजींचे दोन्ही मुलगे, तसेच नातू आदर्श राजेश घनघाव उपस्थित होते, कुंडन गावातील ज्येष्ठ नागरिक श्री. निवृत्ती वाळू कानकोशे, श्री. आदित्य कानकोशे, श्री. शांताराम निपुर्ते तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. रुपाली केसरकर आणि सहशिक्षिका सौ. दिपाली निकम



या सर्वांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तसेच कुटुंबियांनी गुरुजींच्या समाधीस्थळावर जाऊन अभिवादन करण्यात आले.स्मृतीशेष घनघाव गुरुजी हे शिक्षण क्षेत्रातील एक आदर्श व्यक्तिमत्व होते. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षी या स्वरूपाचे उपक्रम राबवले जातात, असे यावेळी घनघाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष श्री राजेश घनघाव यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



# राष्ट्रसंत जनार्दन स्वामी आश्रमांत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड/प्रतिनिधी : दिवसागणिक पर्यावरणाचा असमतोल वाढल्याने पावसाचे प्रमाण कमी होत आहे.वातावरणातील विषारी वायुंच्या दुष्परिणामामुळे रोगराई वाढत असून आरोग्य पातळी ढासळत चालली आहे. त्यामुळे पुढील पिढीला ह्याचा त्रास होणार नाही याची काळजी समाजातील सर्व घटकांनी घेणे गरजेचे आहे.यासाठी हवा, पाणी, जमीन,पर्यावरण प्रदूषित न होण्यासाठी वृक्षारोपण अत्यंत गरजेचे आहे. तसेच प्रत्येक सजीव घटक सृष्टीसाठी महत्त्वाचा असून त्यांचे याद्वारे जतन होणार आहे.

वृक्षारोपणाने वातावरणातील क्सिजनच्या पातळीत वाढ नक्कीच होईल. त्यामुळे वृक्षारोपण हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून प्रदोष निमित्त निफाड कारखाना येथील श्री नर्मदेश्वर महादेव मंदिर व राष्ट्रसंत सदगुरु जनार्दन स्वामी महाराज आश्रमात श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शिवगिरीजी महाराज,राष्ट्रीय अध्यक्ष पंच दशनाम जुना आखाडा यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या भक्तीमय वातावरणात पार पडला.

**श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शिवगिरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती**

याप्रसंगी वाढदिवसाचे औचित्य साधून उपस्थित असलेले लहान बालक युगेंद्र दवते याच्या हस्ते देखील श्रीफळाचे वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी निलेश-गुरु कुलकर्णी, वैभव सुरवाडे, महेश निकम, विकास आहेर, गोडाजी भंडारे, पुरकर, राहुल दवते, युगेंद्र दवते यांनी नारळ, शमी,करंजी, लिंब,गुलमोहर,जांभुल, चिंच, आवला, वड आदींसह फळझाडे, औषधी वनस्पती तसेच सावली देणाऱ्या १५१ वृक्षांची निफाड कारखाना आश्रम, सुकेणे आश्रम, वाहेगाव आश्रम येथे लागवड करण्यात आली.

यावेळी मान्यवरांनी वृक्ष हे निसर्गाचे अमूल्य वरदान असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन काळाची गरज असल्याचे सांगितले व वृक्षांचे नियमित संगोपन करून परिसर हिरवागार ठेवण्याचा संकल्प केला.

यावेळी परिसरातील भाविक व जय जनार्दन भक्त परिवार मोठया संख्येने उपस्थित होता.

## प्रा. विलास कटारे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सापत्नीक जाहीर सत्कार समारंभ उत्साहात संपन्न

# प्रामाणिक, जबाबदार, कर्तव्यदक्ष आणि प्रशिक्षित कार्यकर्त्यांच्या बळावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित समाजाची स्वप्नपूर्ती शक्य आहे : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व कटारे मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी भवन छत्रपती संभाजी नगर येथे ११ जुलै २०२६ ला प्रा. विलास कटारे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त जाहीर सत्कार समारंभ संपन्न झाला.

अध्यक्षीय समारोपात फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे कार्य करीत असताना त्यांनी ९ मार्च १९२४ ला दिलेला त्रिसूत्री संदेश म्हणजे सुशिक्षित करा, संघर्ष करा आणि संघटित व्हा व २० जुलै १९४२ ला नागपूर परिषदेत दिलेला विस्तारीत पंचसूत्री संदेश म्हणजे सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटित व्हा, आत्मविश्वास बाळगा आणि कधी धीर सोडू नका याची जाणीव ठेवून आपण मार्गक्रमण केले पाहिजे. चळवळ केवळ गतिमान करून चालणार नाही तर वेगाने गतिमान करावे लागेल, ज्यात दिशाही अंतर्भूत असेल. खंत व्यक्त करणाऱ्यांनी त्याची पूर्तता होण्यासाठी किंमत मोजावी लागत असते याचे जान आणि भान ठेवले पाहिजे. ज्या समाजातील नेतृत्वाला आपली माणसे आपल्याला मतदान करीत नाहीत असे वाटते त्यांनी २९ मार्च १९३६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मत विकणे हा गुन्हा तर आहेच शिवाय तो आत्मघातही आहे. असा संदेश दिला होता, त्याचे मर्म आपण त्या समाजाला समजावून सांगू शकलो काय? करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अपेक्षिल्याप्रमाणे ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स ची अंमलबजावणी केली पाहिजे. जेणेकरून चळवळीसाठी आवश्यक प्रामाणिक, जबाबदार, कर्तव्यदक्ष आणि प्रशिक्षित कार्यकर्ते उपलब्ध होऊ शकतील. परिणामी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षांची स्वप्नपूर्ती केली जाऊ शकेल. पुढील काळात प्रा. विलास कटारे यासाठी आपले जीवन समर्पित करतील. करिता त्यांना आनंददायक, निरोगी, दीर्घायुष्य लाभो तसेच त्यांच्या संपूर्ण परिवाराला भविष्यकालीन वाटचालीसाठी कोटी कोटी मंगल कामना व्यक्त केल्या.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना आंबेडकरी विचारवंत प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे म्हणाले की, हा केवळ सेवापूर्ती नव्हे तर कृतज्ञता सोहळा आहे. १९७९ नंतर आंबेडकराईट चळवळीचे नेतृत्व करणारे व्यक्ती हे गंगाधर गाडे साहेबाची देण आहे. त्यातील एक व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. विलास कटारे होय. संघटना असली की देश विकता येतो, विकत घेता येतो एवढेच नव्हे तर गहाणही ठेवता येतो. करिता निर्णय प्रक्रियेत जाऊन अंमलबजावणी करण्यासाठी संघटित होणे आवश्यक आहे.

याप्रसंगी रमेश दादा गायकवाड म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणारा समाज घडविण्याचे कार्यात प्रा. विलास कटारे यांचा मोलाचा वाटा आहे. दलित पँथर हे वैचारिक विद्रोही संघटना होती ज्यात गंगाधर गाडे साहेब सोबत प्राध्यापक विलास कटारे कार्यरत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या संचालिका सूर्यकांता गाडे मॅडम म्हणाल्या की, आपण जर एकत्रपणे संघटित होऊ शकलो नाही तर पुढील पिढ्यांना वाईट दिवस येतील. गंगाधर गाडे साहेबांनी त्यांच्या कार्य काळात दे दान सुटे गिराण याप्रमाणे कार्य केले होते.

सत्कार समारंभात मनोगत व्यक्त करताना सत्कारमूर्ती प्रा. विलास कटारे म्हणाले की, समाजात काम करीत असताना समाजाच्या आस्था आणि अपेक्षांना तडा जाऊ नये, याची दक्षता बाळगली पाहिजे. सर्वांच्या खंत पूर्णत्वासाठी सर्वांची मोट बांधून सामाजिक एकजूट करावी लागेल. यापसंगी प्रकाश कांबळे, अंबादास



रगडे, निवृत्ती दहिफळे, योगेश ठाकूर, सुभाष मोकळे, परशुराम सोनवणे, भारतीय क्रांती दलाचे शैलेंद्र मिसाळ, माजी नगरसेवक मिलिंद दाभाडे, एकलव्य संघटनेचे संस्थापक पवन सोनवणे, रमेशदादा गायकवाड, नगरसेविका प्रेमलता दाभाडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सर्व उपस्थितानी व विविध पक्ष संघटनांच्या कार्यकर्त्यांनी प्रा. विलास कटारे यांचा सापत्नीक सत्कार केला. प्रास्ताविक सुभाष ठोकळ, सूत्रसंचालन शशिकांत काळे तर आभार मिलिंद बागुल यांनी व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी डॉ. कल्पना गंगावणे, डॉ. जोगेंद्र पाचगावकर, ॲड. सुनीलकुमार नागवंश, ड. विलास रामटेके, ड. राजू बागुल, वरिष्ठ संशोधन अधिकारी चंदा मगर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकाची गोवा बनावटीच्या विदेशी मद्य वाहतूकीवर धडक कारवाई

## १ कोटी २४ लाख ७१ हजार रुपयांचा मुददेमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्य उत्पादन शुल्क भरारी पथकाच्या माळशिरस विभागाने रविवार दि. १२ जुलै रोजी दुपारी मौजे मळोली ता. माळशिरस येथे सापळा रचुन गोवा राज्य निर्मीत व महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधीत असलेले विदेशी मद्य वाहतूकीवर कारवाई करून आरोपीच्या ताब्यातून १ कोटी २४ लाख ७१ हजार रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला.

सदर ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईत गोवा राज्य निर्मीत व महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंध असलेले विदेशी मद्याचे ७५० मिली क्षमतेच्या ८ हजार ४०० बाटल्या (७०० बॉक्स) एकून रक्कम ९२ लाख ४० व एक चौदा टायर ट्रक अंदाजे किंमत ३२ लाख रुपये व तीन मोबाईल अंदाजे किंमत ३१ हजार असा एकून १ कोटी २४ लाख ७१ हजार रुपयांचा मुददेमाल जप्त करुन महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये दोन इसमांवरती गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सदर कारवाई निरीक्षक सचिन भवड, राकेश पवार दुय्यम निरीक्षक सौरभ भोसले, बाळासाहेब नेवसे, अमित नांगरे, अक्षय सस्ते, स्वप्नील सोनवलकर, प्रितम पडवळ, सहा. दु.निरी. एस.ए.बिराजदार, जवान योगेश पाटील, प्रविण पुसावळे, देवीदास चौधरी, संजय पराडे, रेवनसिद्ध कांबळे, योगीराज तोग्गी, युवराज टेळे, आबासो कसबे, सचिन भोसले, किरण गोळे, रोहित लोखंडे, सुजित जाधव, दिवेश फडतरे, सौरभ गुरव, ओंकार जाधव, महिला जवान कल्पना जाधव जवान नि. वाहन चालक मारुती जडगे यांनी पार पाडली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास श्री. सौरभ भोसले दुय्यम निरीक्षक हे करत आहेत.

जिल्हयामध्ये बनावट दारु तसेच हातभट्टी दारु निर्मिती, विक्री, वाहतूक तसेच इतर कोणत्याही प्रकारच्या दारुची निर्मिती, विक्री व वाहतूक होत असल्याचे निर्दशनास आल्यास त्याची माहिति तात्काळ या कार्यालयास देण्यात यावी. तसेच टोल फ्री क्र.१८००८३३३३३३व व्हॉटस अॅप क्र. ८४२२००११३३ यावर संपर्क साधावा असे आवाहन श्रीमती भाग्यश्री जाधव यांनी केले आहे.




## स्वेरीज् डी.फार्मसीचा यंदाही घवघवीत निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित डिप्लोमा फार्मसी कॉलेजचा प्रथम व द्वितीय वर्षाचा निकाल नुकताच लागलेला आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (एम.एस.बी. टी.ई.) ने जाहीर केलेल्या निकालात स्वेरी संचलित डी. फार्मसीच्या सोनाली खटके यांनी प्रथम वर्ष तर समृद्धी दीक्षित यांनी द्वितीय वर्ष डिप्लोमा फार्मसी महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

रपूर परिसरातील विद्यार्थ्यांना डिप्लोमा फार्मसीच्या शिक्षणासाठी मुंबई, पुणे, सांगली, सोलापूर अशा मोठया शहरात जावे लागत होते. विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय पाहून व त्याचबरोबर संस्थेच्या शिक्षण क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे संस्थेचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांनी पंढरपूर पंचक्रोशीतील नागरिकांच्या फार्मसीकरीता असणाऱ्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर २० वर्षांपुर्वी डी.फार्मसी कॉलेजची स्थापना केली. या ही वर्षी विद्यार्थ्यांनी यशाची परंपरा कायम राखल्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या प्रथम वर्ष डिप्लोमा फार्मसी परीक्षेमध्ये अनुक्रमे प्रथम क्रमांक सोनाली खटके (८२.९० टक्के), द्वितीय क्रमांक सीमा सपाटे (८१.४० टक्के), तृतीय क्रमांक खुशबू कोरबू (८१.३० टक्के) यांनी मिळविले. तर द्वितीय वर्ष डिप्लोमा फार्मसी मध्ये अनुक्रमे प्रथम क्रमांक समृद्धी दीक्षित (८५.८२ टक्के), द्वितीय क्रमांक ओम थोरवत (८५.०९ टक्के ), तृतीय क्रमांक शोभा मासाळ (८४.९१टक्के) यांनी मिळवले. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. सतिश मांडवे यांच्यासह प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष श्री. अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त, सचिव डॉ. सुरज रोंगे, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. डॉ. सतीश मांडवे, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले.

**प्रथम वर्षात सोनाली खटके प्रथम तर द्वितीय वर्षात समृद्धी दीक्षित सर्वप्रथम**

## श्री राजकुमार काशिनाथ कुलकर्णी यांना 'आदर्श मुख्याध्यापक' म्हणून सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भुरीकावठे : भुरिकावठे येथील शंकरराव शरणप्पा आष्टे प्रशालेचे मुख्याध्यापक श्री राजकुमार कुलकर्णी यांना नुकतेच सोलापूर जिल्हा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी पतसंस्थेतर्फे 'आदर्श आणि प्रभावी मुख्याध्यापक पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. कुलकर्णी सर गेल्या पाच वर्षांपासून मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असून, त्यांनी अक्कलकोट तालुक्यात एक कडक आणि शिस्तप्रिय मुख्याध्यापक म्हणून नावलौकिक मिळवला आहे. माजी आमदार सावंत म्हणाले की, हा सन्मान कुलकर्णींच्या नेतृत्वाखाली शाळेच्या सातत्याने सुधारणाऱ्या शैक्षणिक निकालांची साक्ष आहे. यावेळी त्यांचे संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार आष्टे,



उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, सचिव अप्पासाहेब गवसने व संचालक मंडळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला .याप्रसंगी शाळेचे कर्मचारी शिवानंद ढंगापुरे, मोनेश्वर सुतार, अजित गवसने, सुहास सोलनकर, प्रशांत गायकवाड, हनुमंत धूळशेट्टी, दिलीप व्हदलूरे, आदींनी अभिनंदन केले. शिवानंद कांबळे, युवराज कुंभार, सुनील वडरे उपस्थित होते.

## छत्री, हरिपाठ व मिष्ठान्न वाटपातून वारकऱ्यांची सेवा; रामेश्वर दिंडीचा वारकऱ्यांना मराठी पत्रकार संघटनेचा आधार

**धांदरफळ ते पंढरपूर दिंडीच्या वारकऱ्यांची राहुरीत स्वागत.. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे वतीने वारकऱ्यांना छत्री हरीपाठ महाप्रसादाचे वाटप . पत्रकार संघाच्या कार्याचे जिल्हा परिषद सदस्य रामहरी कातोरे यांच्याकडून कौतुक**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुरी : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने वारकऱ्यांना छत्री, हरिपाठ व मिष्ठान्नाचे वाटप करून भक्तसेवेचा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. घटनेचे राज्याध्यक्ष विश्वासराव आरोटे, जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे तसेच मनोज साळवे यांच्या हस्ते हा सेवा उपक्रम पार पडला. यावेळी...महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या संचालिका परिघा आरोटे सोनेरी विश्वास आरोटे छत्रपती विश्वास आरोटे...आदि उपस्थित होते या उपक्रमामुळे दिंडीतील वारकऱ्यांमध्ये समाधान व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

राहुरी फॅक्टरी हद्दीतील घुले वस्ती येथे वारकऱ्यांचा मुक्काम असलेल्या ठिकाणी जाऊन मराठी पत्रकार संघटनेने हा स्तुत्य उपक्रम राबवला.

श्री क्षेत्र रामेश्वर अधिष्ठीत पंचक्रोशी वारकरी पायी दिंडी सोहळ्याचे २३ वे वर्ष यंदा मोठ्या भक्तिभावात साजरे करण्यात आले. श्री क्षेत्र रामेश्वर (धांदरफळ बु।।, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) येथून श्री संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्याबरोबर श्री क्षेत्र पंढरपूरकडे दिंडीचे प्रस्थान करण्यात आली होती या दिंडीचे राहुरी फॅक्टरी येथे मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने पावसाचा आधार म्हणून छत्री, हरिपाठ व मिष्ठांन वारकऱ्यांना देण्यात आले.संगमनेर विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद सदस्य इंजी रामहरी कातोरे यांनी या सेवाभावी उपक्रमाचे विशेष कौतुक केले. वारकरी पंढरपूरकडे माऊलीच्या दर्शनासाठी जात असताना पावसाळ्यात त्यांच्या संरक्षणासाठी छत्री वाटप करणे हा अत्यंत उपयुक्त आणि समाजहिताचा उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार हा समाजातील चांगल्या-वाईट प्रत्येक परिस्थितीत जनतेच्या मदतीसाठी धावून जाणारा महत्त्वाचा घटक असून, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाने सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या या कार्याचे त्यांनी अभिनंदन केले. तसेच सर्व वारकरी बंधू-भगिनींना पंढरपूर यात्रेसाठी शुभेच्छाही दिल्या.

दिंडी प्रस्थानापूर्वी सकाळी ६.०० वाजता मा. श्री. अनिलराव प्रतापराव देशमुख (माजी सभापती, कृ.उ.बा.स. संगमनेर) यांच्या शुभहस्ते श्री भगवान रामेश्वरास अभिषेक करण्यात आला. त्यानंतर भक्तिमय वातावरणात टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडी मार्गस्थ झाली.

या दिंडीचे मार्गदर्शन ह.भ.प. सुदाम महाराज कोकणे (अध्यक्ष, संगमनेर तालुका वारकरी संघटना) यांनी केले असून वारकरी परंपरेचा वारसा जपत भक्ती, नामस्मरण आणि समाजप्रबोधनाचा संदेश देत दिंडी पुढे सरकत आहे.

या प्रसंगी मा. अॅड. माधवराव कानवडे (व्हा. चेअरमन, ए.डी. सी.सी. बँक, अहिल्यानगर), मा. संपतराव विष्णु डोंगरे (चेअरमन, शेतकी संघ, संगमनेर), मा. पांडुशेठ दामोदर घुले (व्हा. चेअरमन, स.म.भा.थो.स.का., संगमनेर) तसेच मा. रोहिदास गेनुजी डेरे (खजिनदार, अगस्ती आश्रम ट्रस्ट, आळंदी) यांनी शुभेच्छा देत दिंडीस प्रोत्साहन दिले.

भक्तिभाव, परंपरा आणि समाजएकतेचा संदेश देणारा हा दिंडी सोहळा वारकरी संप्रदायाच्या अखंड परंपरेचा जिवंत वारसा असल्याचे यावेळी भाविकांनी व्यक्त केले. यावेळी डॉ विश्वास आरोटे परिघा आरोटे पत्रकार अनिल कोळसे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने हा स्तुत्य उपक्रम घेतल्याने वारकऱ्यांनी संघटनेचे आभार मानले व पदाधिकाऱ्यांचा यथोचित सन्मान केला.

**वारंवार वीजखंडिती, आणि विलंबित दुरुस्तीबाबत तीव्र नाराजी; नियमित वीजपुरवठा व दर्जेदार ग्राहक सेवेची मागणी**

## पडघा परिसरातील वीज समस्यांवर टोरंट पॉवरसोबत सामाजिक कार्यकर्त्यांची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा व परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होत असून, या गंभीर समस्येच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर यांच्या पुढाकाराने टोरंट पॉवर लिमिटेडच्या अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. नागरिकांच्या वाढत्या तक्रारी लक्षात घेऊन प्रकाश भोईर यांनी यापूर्वी टोरंट पॉवरच्या व्यवस्थापनाकडे सविस्तर निवेदन सादर केले होते. त्या निवेदनाची दखल घेत पडघा येथील कार्यालयात ही बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत पडघा आणि परिसरातील वारंवार होणारी वीजखंडिती, कमी-जास्त दाबाचा वीजपुरवठा, तक्रारींचे वेळेवर निराकरण न होणे, बिघाडानंतर दुरुस्ती करण्यास होणारा विलंब तसेच ग्राहकांना अधिक



तत्पर व दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

सामाजिक कार्यकर्त्यांनी सांगितले की, अनियमित वीजपुरवठ्यामुळे घरगुती ग्राहकांसह व्यापारी, विद्यार्थी, रुग्ण, लघुउद्योजक, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात वारंवार होणाऱ्या वीजखंडितीमुळे दैनंदिन काम काज ठप्प होत असून, नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. त्यामुळे वीजपुरवठा अधिक स्थिर, अखंड आणि विश्वासार्ह ठेवण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना राबविण्याची मागणी करण्यात आली.यावेळी सामाजिक कार्यकर्त्यांनी वीज यंत्रणेची नियमित देखभाल, दोषग्रस्त उपकरणांची तातडीने दुरुस्ती, तक्रार निवारणासाठी स्वतंत्र आणि कार्यक्षम यंत्रणा, तसेच ग्राहकांना जलद प्रतिसाद देणारी सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. भविष्यात अशा समस्या टाळण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

बैठकीला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर यांच्यासह भगवान सांबरे, अजय पाटील, शैलेश बिडवी, रमेश शेलार, संजय पटेल, महेश राऊत, भास्कर पाटील, काशिनाथ शेलार, मुजाहीद नाचण, अशोक बजागे आदी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

टोरंट पॉवरच्या वतीने पडघा विभागाचे उपमहाव्यवस्थापक किरण ऊपरकर, व्यवस्थापक महेंद्र काटे आणि जनसंपर्क अधिकारी अमित कडू यांनी बैठकीत उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या शांतपणे ऐकून घेतल्या. संबंधित तक्रारींचे प्राधान्याने निराकरण करण्यासाठी आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय उपाययोजना करण्यात येतील, तसेच ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्यासाठी कंपनी सकारात्मक भूमिका घेईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

बैठकीनंतर पडघा परिसरातील नागरिकांनी या चर्चेतून सकारात्मक तोडगा निघेल, नियमित व अखंड वीजपुरवठा सुरू राहील आणि प्रलंबित तक्रारींचे लवकर निराकरण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत प्रशासन आणि सेवा पुरवठादार संस्थांनी अधिक संवेदनशील व उत्तरदायी भूमिका घेण्याची गरज असल्याचेही मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## पंढरपुरात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे स्वागत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील माजी नगरसेवक किरण राज घाडगे यांनी प्रताप निर्णय जंगी स्वागत केले आहे यावेळी भरण्यात शुगरचे अनिल दादा सावंत, शिंदे शिवसेना सोलापूर जिल्हा अध्यक्ष बालाजी बागल नगरसेवक अमोल बापू शिंदे, पदाधिकारी अधिक मान्यवर उपस्थित होते किराणात घाडगे यांनी पर्यावरण मंत्री प्रताप सरनाईक यांना पंढरपूर शहरांमधून जड वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, आषाढी यात्रेच्या तोंडावर जड वाहतूक होत आहे कोणतेही अनुचित प्रकार घडून येण्यासाठी त्यांनी पंढरपूर शहरातील जड वाहतूक पूर्णपणे बंद करा या आशयाचे निवेदन ही माझी नगरसेवक केलेला घाडगे यांनी परिवहन मंत्री प्रताप शहनाईक यांना दिले आहे.